# नगर दिवाणी व सत्र न्यायालय, फोर्ट, मुंबई—४०००३२.

जा.क्र.देखभाल विभाग/१८८० /२०२४

दिनांक :— 23 JUL 2024

## निविदा सूचना

नगर दिवाणी व सत्र न्यायालय, मुंबई या न्यायालयामधील केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाच्या विशेष न्यायालयासाठी सन—२०१२ मध्ये खरेदी करण्यात आलेली वाहने **क्र.MH-01-AN-204, MH-01-AN-205 आणि MH-01-AN-206 [Tata Manza]** या वाहनांची खुल्या बोली पध्दतीने विक्री करण्यात येत आहे. सदर विक्रीबाबताच्या अटी व शर्तीची या कार्यालयाच्या सूचना फलकावर आणि अधिकृत संकेस्थळावर (www.district.ecourts.gov.in /mumbai-citycivil-court) **दि.२४/०७/२०२४ पासून ते दि.३१/०७/२०२४ पर्यंत बघता येतील.**

तसेच सदर बोली पध्दतीची प्रक्रिया **दि.०३/०८/२०२४ रोजी दुपारी ०२:०० ते ०२:३० वाजेपर्यंत** नगर दिवाणी व सत्र न्यायालय,जुनी इमारत,तळमजला येथील न्यायालयीन कक्ष क्र.३८ मध्ये मा.पुलकार समिती न्यायाधीशांच्या उपस्थितीत राबविण्यात येणार आहे. तरी ईच्छूक व्यक्ती अथवा संस्था यांनी सदर बोलीत सहभागी होण्यासाठी वरील नमूद केलेल्या दिनांक व वेळेत हजर रहावे.

सही/—
प्रबंधक,
नगर दिवाणी व सत्र न्यायालय,
बृहन्मुंबई.

**नगर दिवाणी व सत्र न्यायालय, फोर्ट, मुंबई—४०००३२**
**<u>येथील निर्लेखित वाहनांच्या विक्रीबाबत नियम, अटी व शर्ती.</u>**

१) नगर दिवाणी व सत्र न्यायालयातील केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाच्या विशेष न्यायालयाची निर्लेखित केलेली शासकीय वाहने क्र.**MH-01-AN-204, MH-01-AN-205, आणि MH-01-AN-206 [Tata Manza]** ही खुल्या बोली पध्दतीने **''जेथे आहे व जसे आहे तसे''** या तत्वावर विक्री करणे आहे.

२) उपरोक्त वाहने **देखभाल विभाग, नगर दिवाणी व सत्र न्यायालय, जुने सचिवालय आवार,फोर्ट, मुंबई—३२** येथे पाहण्यासाठी **दि.२४/०७/२०२४ पासून ते दि.३१/०७/२०२४ पर्यंत सकाळी ११:०० पासून ते सायकांळी ०४:३० वाजेपर्यंत** इच्छूक खरेदीदारांना पाहता येईल. तसेच वाहनाची कागदपत्रे वरील ठिकाणी पाहणीसाठी उपलब्ध राहतील.

३) सदर विक्री ही खूल्या पध्दतीने करण्यात येणार असल्याने इच्छूक खरेदीदाराने विहित मुदतीत उपस्थित राहणे अनिवार्य आहे.

४) इच्छूक खरेदीदारांनी वाहन खरेदी करण्याच्या दिवशी सोबत पॅनकार्ड/आधारकार्ड यांची प्रत आणणे बंधनकारक आहे.

२...

५) वर नमूद केलेल्या तीन (३) वाहनांच्या विक्रीबाबतची बोलीची किंमत प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी ठरवून दिलेली असून, त्याप्रमाणे शासकीय वाहने क्र.**MH-01-AN-204, MH-01-AN-205** व **MH-01-AN-206 [Tata Manza] या तीनही वाहनांसाठी अनुक्रमे रु.५०,०००/—, रु.५०,०००/— व रु.५०,०००/—** अशी आहे. **प्रत्यक्ष बोलीला सदर किमतींच्या पुढे सुरुवात होईल.** सदर किंमतीपेक्षा सर्वात जास्त रक्कमेच्या बोली असलेल्या खरेदीदारास या प्रक्रियेमध्ये **''यशस्वी खरेदीदार''** म्हणून घोषित करण्यात येईल व त्यांना **बयाना रक्कम म्हणून बोली किंमतीच्या १०% रक्कम** तात्काळ लेखा विभागास भरणा करावी लागेल.

६) बोली अंती यशस्वी खरेदीदाराने लावलेली बोलीची एकूण रक्कम जर कामकाजाच्या ५ दिवसात या कार्यालयाकडे भरणा केली नाही तर वरील नमूद अनुक्रमांक ५ नुसार लेखा विभागाकडे भरणा केलेली **१०%** बयाना रक्कम ही जप्त केली जाईल.

७) यशस्वी खरेदीदारांनी लावलेल्या बोलीची एकूण रक्कम कार्यालयीन कामकाजाच्या ५ दिवसात **''प्रबंधक, नगर दिवाणी व सत्र न्यायालय, मुंबई—४०००३२''** यांच्याकडे रोख स्वरुपात भरणा करणे आवश्यक राहील. अन्यथा, त्यांची बोली रद्दबातल ठरविली जाईल व उपरोक्त —

३...

अ.क्र.५ मध्ये नमूद केलेल्या निवड पक्रियेनूसार विक्रीच्या किंमतीपेक्षा जास्त बोली सादर करणा—या द्वितीय क्रमांकाच्या खरेदीदारास **"यशस्वी खरेदीदार"** म्हणून घोषित करण्यात यईल.

८) यशस्वी खरेदीदाराने बोलीची रक्कम भरणा केल्यानंतर एक आठवडयात सदर वाहन प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या हस्तांतर प्रक्रियेस अधिन राहून आहे त्या ठिकाणावरुन स्वखर्चाने ताब्यात घेणे आवश्यक राहील. त्यासाठी देखभाल विभाग, नगर दिवाणी व सत्र न्यायालय, मुंबई तर्फे कोणतेही मनुष्यबळ किंवा इतर खर्च देण्यात येणार नाही. तसेच, सदर वाहन वाहतूक करताना/ताब्यात घेताना आवश्यक असलेले शुल्क/कराचा भरणा किंवा अनुषंगिक खर्चाची जबाबदारी संबंधित खरेदीदाराची राहील.

९) **'यशस्वी खरेदीदार"** यांने प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून आपल्या नावे वाहनाची नोंदणी होत नाही, तोपर्यंत वाहन रस्त्यावर वापरात आणणार नाही, असे हमीपत्र रु.१००/— च्या स्टॅम्प पेपरवर देणे बंधकारक राहील.

१०) यशस्वी खरेदीदाराने कोणत्याही कारणास्तव वाहन ताब्यात घेण्यास नकार दिल्यास त्यांनी वाहन खरेदी करते वेळी जमा केलेली बोलीची रक्कम कोणत्याही कारणास्तव परत केली जाणार नाही.

११) खुल्या बोलीबाबत खरेदीदाराची कोणतीही अट/शर्त स्विकारली जाणार नाही.

१२) कोणतेही कारण न देता वाहन विक्री प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर थांबविणे किंवा नाकरण्याचे पूर्ण अधिकार मा.प्रधान न्यायाधीश, नगर दिवाणी व सत्र न्यायालय, फोर्ट, मुंबई—४०००३२ यांनी राखून ठेवले आहेत.

**आदेशावरुन**

**सही/—**
**प्रबंधक,**
**नगर दिवाणी व सत्र न्यायालय,**
**बृहन्मुंबई.**

**नगर दिवाणी व सत्र न्यायालय, बृहन्मुंबई**
**येथील निर्लेखित वाहनाच्या विक्रीबाबत तपशिल—**

| अ.क्र. | निविदा प्रक्रीया तपशिल | कालावधी |
|---|---|---|
| १ | लोकप्रिय दैनिक मराठी आणि इंग्रजी वृत्तपत्रांमध्ये जाहिरात प्रसिध्द करणे तसेच नगर दिवाणी व सत्र न्यायालय, मुंबई यांच्या संकेतस्थळावर तसेच सूचना फलकांवर खुल्या बोली पध्दतीने वाहन विक्री प्रक्रिया प्रसिध्दीचा दिनांक | दिनांक २३/०७/२०२४ |
| २ | खुल्या बोली पध्दतीने वाहन विक्री करण्यात येणारी वाहने पाहणीसाठीची दिनांक व वेळ | दिनांक २४/०७/२०२४ ते दिनांक ३१/०७/२०२४ सकाळी : ११:०० वा. ते सायकाळी : ०४:३० वा.पर्यंत |
| ३ | खुल्या बोली पध्दतीने वाहन विक्री प्रक्रियेचा दिनांक व वेळ | दिनांक ०३/०८/२०२४ दुपारी : ०२:०० ते ०२:३० वाजता |

सही/—
प्रबंधक
नगर दिवाणी व सत्र न्यायालय,
बृहन्मुंबई.

नगर दिवाणी व सत्र न्यायालय, बृहन्मुंबई

जुने सचिवालय आवार, फोर्ट, मुंबई– ४०००३२.

[केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाच्या विशेष न्यायालयाची वाहने]

१. वाहन निर्लेखन आदेश क्र.देखभाल विभाग/१६००/२०२४, दि.२५.०६.२०२४.
२. वाहन निर्लेखन आदेश क्र.देखभाल विभाग/१६०१/२०२४, दि.२५.०६.२०२४.
३. वाहन निर्लेखन आदेश क्र.देखभाल विभाग/१६०२/२०२४, दि.२५.०६.२०२४.

| Sr. No. | Vehicle Nos | Name of Company | Type of Vehicle | Engine No. | Chasis No. | Date of Purchase | Purchase Value (In Rs.) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | MH-01-AN-204 [Tata Manza] | Tata Motors Ltd. | Saloon | 323B68007086933 | MAT613239CLC07287 | 23/04/2012 | Rs.590920=00 |
| 2 | MH-01-AN-205 [Tata Manza] | Tata Motors Ltd. | Saloon | 323B66007086932 | MAT613239CLC07288 | 23/04/2012 | Rs.590920=00 |
| 3 | MH-01-AN-206 [Tata Manza] | Tata Motors Ltd. | Saloon | 323B66007086937 | MAT61322239CLC07283 | 23/04/2012 | Rs.590920=00 |